मुख्य अभियंता (पथ)कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.पथ- ८७
दिनांक- १५|०५|१७

# वर्क ऑर्डर

**मा. कार्यकारी अभियंता,**
एम.एस.ई.डी.सी.एल.,
महावितरण कंपनी लि.
ॲडमिन बिल्डींग, तळमजला, रास्तापेठ,
पुणे.

यांजकडेस .......

**विषय :** – नगररोड विभागांतर्गत पायाभूत आराखडा योजना – २ मधील मोझेवाडी वडगावशेरी, गणेशनगर प्रीत प्रसन्न पंपिंग स्टेशन सैनिकवाडी वडगाव शेरी येथे खोदाई चराद्वारे उर्वरीत भुमिगत विद्युत केबल टाकणे कामांसाठी **मुदतवाढ** मिळणेबाबत.

**संदर्भ:** –
१) मा. महा.आयुक्त ठ.क्र. ६/११२ दि. ०७/०७/२०१५
२) मुख्य सभा ठराव क्र. ७० दि. २२/६/२०१५
३) पथ कार्यालयाकडील डिमांड नोट क्र. ४०९४ दि. २४/९/२०१५
४) मा. मुख्य अभियंता (पथ) ठ.क्र. १/२०० दि. ३०/११/२०१५
५) म.रा.वि.वि. कार्यालयाकडील पत्र क्र. २९६ दि. २८/१/२०१६
६) म.रा.वि.वि. कार्यालयाकडील मुदतवाढ अर्ज अर्ज क्र. ०३२१४ दि. १७/१०/२०१६ मधील अ.क्र. ५
७) म.न.पा.कडे जमा केलेली र.रू. २५,३८,०००/- चलन क्र.११९४४ दि. ७/४/२०१६
८) पथ विभागाकडील कार्यादेश क्र. १८ दि. ७/४/२०१६
९) मुख्य अभियंता (पथ) जावक क्र. पथ/६१८३ दि. ५/१२/२०१६ रोजीचे पत्र.
१०) मुख्य अभियंता (पथ) ठराव क्र. १/१३५ दि. १५/१२/२०१६ रोजीचे पत्र.
११) एम.एस.ई.डी.सी.एल. यांचे दि. ३/५/२०१७ रोजीचे मुदतवाढ अर्ज.
१२) एम.एस.ई.डी.सी.एल. यांचे दि. ८/५/२०१७ रोजीचे मुदतवाढ अर्ज.
१३) **मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/६८ दि. ९/५/२०१७**

**खोदाईकरण :** भुमीगत विद्युत केबल टाकणे करीता

आपल्या संदर्भ क्र. ९ चे अर्जाचे अनुसरून आपणास खालीलप्रमाणे भुमिगत विद्युत केबल दुरूस्तीकरीता खोदाई करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | **खोदाई करण्याचा रस्ता व ठिकाणे** | मोझेवाडी वडगावशेरी, गणेशनगर प्रीत प्रसन्न पंपिंग स्टेशन सैनिकवाडी वडगाव शेरी |
| २ | **सुरूवातीचे ठिकाण** | नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| ३ | **शेवटचे ठिकाण** | नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| ४ | **खोदाई परवानगी लांबी एकुण**<br>अ) पी.व्ही.सी. पाईप/आर.सी.सी. पाईप<br>ब) डांबरी रस्ता/फुटपाथ/ पीट | **१०८० र.मी. पैकी ४७० र.मी. काम पुर्ण उर्वरीत ६१० र.मी. चे काम बाकी**<br><br>**१०८० र.मी. पैकी ४७० र.मी. काम पुर्ण उर्वरीत ६१० र.मी. चे काम बाकी** |
| ५ | **खोदाई सुरूवात दि.** | १२/५/२०१७ |

१. मा. मुख्य सभा ठराव क्र.५० दि. २०/०५/२०१४ मधील सर्व बाबी बंधनकारक राहतील.

२. टेली कम्युनिकेशन कंपन्या/ केबलधारकांना महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागाकडील DIT/फाईल-०३/३३६, मंत्रालय,मुंबई दि. ०१/०४/२००६ मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

३. पुणे महानगरपालिकेची खोदाई बाबतची मार्गदर्शिका पुस्तिका ही पथ विभागाकडे उपलब्ध आहे. सदर मार्गदर्शिका पुस्तिकेमधील सर्व बाबींचे पालन करणे खोदाईधारक कंपन्यांना बंधनकारक राहील.

४. खोदाईची परवानगी प्राप्त झाल्यावर संबंधित पथ विभागाकडील अभियंत्याशी संपर्क साधुन त्यांचे सुचनेनुसार रस्त्याच्या कडेने केबल/पाईप लाईन टाकणेचे काम सुरू करावयाचे आहे.

५. वर नमुद खोदाईची लांबी, सुरूवातीचे व शेवटचे ठिकाण तसेच खोदाई सुरूवात दिनांक व शेवट दिनांक यामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येऊ नये.

६. काही कारणांमुळे वर नमुद खोदाईच्या सुरूवात व अंतिम दिनांकामध्ये बदल करण्याचा अधिकार मा.अधिक्षक अभियंता यांना राहील. त्याप्रमाणे खोदाई कंपनीस लेखी संपर्क साधुन कळविण्यात येईल व ते कंपन्यांवर बंधनकारक राहील.

७. एकाच रस्त्यावर विविध कंपन्याकडुन खोदाई होणार असल्यास त्याप्रमाणे सर्व कंपन्यांनी एकत्र येऊन सहमतीने एकाच वेळेस एकाच खोदाईमधुन केबल टाकण्याचे नियोजन करावे.

८. त्यानुसार एकाच रस्त्यांवरील विविध कंपन्यांमध्ये व्यवस्थित समन्वय असणे आवश्यक आहे. तसेच या कंपन्यांनी एकमेकांशी खोदाईबाबत सहकार्य करणेही आवश्यक आहे. परंतु या सर्व कंपन्यांनी स्वतंत्रपणे अर्ज करून स्वतंत्रपणे मान्यता घेणे आवश्यक आहे.

९. रस्त्याच्या मुख्य भागा (Carriageway) मधुन रस्ता खोदाईस शक्यतो परवानगी देण्यात येणार नाही. परंतु काही कारणांमुळेकेबल/पाईपलाईन रस्त्याच्या कडेने/फुटपाथमधुन टाकणे शक्य नसल्यास रस्त्याच्या कडेने फुटपाथचे बाजुने खोदाई करण्यास परवानगी देण्यात येईल. खोदाई करणाऱ्या कंपन्यांनी काम सुरू करणेपुर्वी संबंधित पुणे मनपाचे अभियंत्यांकडुन खोदाईची लाईनआऊट मान्य करून घ्यावी.

१०. खोदाईस सुरूवात करण्यापुर्वी खोदाई करण्याच्या पुर्ण लांबीवर बॅरीगेटस व वॉर्निंग टेप सुचना पाट्या लावुन सदर भाग संरक्षित करावा. रात्रीच्यासाठी रेडीअम रिफ्लेक्टर व सुरक्षिततेबाबत पुर्ण पालन करावे जेणेकरून तेथे कोणताही अपघात होणार नाही याची खबरदारी घ्यावी. या सुरक्षितेबाबत हलगर्जीपणा केल्यास व त्यामुळे कोणताही अपघात घडल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी खोदाईधारक कंपन्यांची राहील.

११. पुणे महानगरपालिका खोदाई मार्गदर्शिका पुस्तिका, जोडपत्र क्र.९ नुसार खोदाईधारक कंपन्यांनी १०० मी. पर्यतच्या खोदाई कामाचे सुरूवातीस व शेवटचे ठिकाणी कामाच्या माहितीचा बोर्ड लावणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपन्याच्या केबल खोदाई १०० मी. पेक्षा जास्त लांबीची असल्यास त्यांनी या लांबीच्या दरम्यान मध्ये तसेच चौकांमध्ये बोर्ड लावणे बंधनकारक आहे. सदर बोर्डावर (फलकावर) अ) खोदाई करणाऱ्या कंपन्याचे नाव ब) खोदाई सुरू दि. १२/०५/२०१७ क )खोदाई पुर्ण दिनांक ३०/५/२०१७ ड) कंपनीकडील प्रतिनिधी/अभियंत्याचे नाव इ)संपर्क क्रमांक/फोन नं.---फ) परवानगी/कार्यादेश दि.------- ज) पथ विभागाकडील कनिष्ठ अभियंताचे नाव व फोन नं या बाबीचा उल्लेख करून 'खोदाई कामामुळे असुविधा होत असलेबद्दल क्षमस्व' असे नमुद करावे.

१२. आवश्यक त्या ठिकाणी पुरेसे सुरक्षा रक्षक व वाहतुक नियोजनासाठी वॉर्डन नेमण्यात यावेत.

१३. रस्त्यावरील पावसाळी जाळ्यांवरील कव्हर्स व पाणी जाण्याची ठिकाणे व्यवस्थित आच्छादन टाकुन झाकावे जेणेकरून खोदाईची माती त्यामध्ये जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१४. खोदाई धारक कंपन्याकडील साईट इनचार्ज/अभियंता यांनी खोदाई मार्गदर्शिका पुस्तिकेतील नमुना-१० नुसार दर आठवड्याला कामाच्या प्रगतीचा अहवाल पुणे महानगरपालिकेकडे सादर करावा.

१५. आवश्यकतेनुसार रस्ता क्रॉसिंगसाठी व मिळकतधारकंच्या गेटसमोर लोखंडी प्लेटचा वापर करावा.

१६. रात्रीच्या वेळी रेडीअम रिफेलक्टर व सुरक्षा विषयक दिवे खोदाईच्या पुर्ण लांबीला लावण्यात यावेत.

१७. खोदाईची परवानगी १०० मी. पेक्षा जास्त असल्यास खोदाईधारकाने एका वेळेस १०० मी. पर्यतचीच खोदाई हाती घ्यावी. सदर खोदाईमध्येकेबल/पाईप टाकुन खोदाई पुर्नभरण करणे व सर्व राडारोडा बाजुला करून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करूनच पुढील लांबीच्या खोदाईचे काम हाती घ्यावे.

१८. त्याच खोदाईमध्ये अन्य कंपन्याच्या केबल/पाईप लाईन टाकण्यात येणार असल्यास खोदाई करणाऱ्या कंपनीने त्या सर्वकंपनीशी समन्वय व सहकार्य करणे आवश्यक आहे.

१९. खोदाईमधील संपुर्ण माती/राडारोडा उचलुन वाहतुक करून हलविण्याची जबाबदारी कंपनीची राहील.

२०. खोदाई करणे व त्याचे पुर्नभरणीकरण करणेचा कालावधी संबंधित कंपनीवर बंधनकारक राहील.

२१. रस्ता पातळीपेक्षा उंच कोणतेही चेंबर्स,बॉक्स व कट्टे करण्यास परवानगी नाही. महाराष्ट्र राज्य वीज वितरण मंडळाने याबाबत स्वतंत्र नकाशासह मान्यता घेऊनच अंमलबजावणी करावी.

२२. खोदाई करणाऱ्या कंपनीने परिसरातील नागरिकांना/वाहतुकीस कमीत कमी गैरसोय होईल याची दक्षता घेऊन काम करावयाचे आहे. रस्त्यावर खोदाईचे कामे करताना वाहतुकीस मार्ग खुला सोडुन त्याप्रमाणे व्यवस्था करून काम करवयाचे आहे. रस्त्यावरील गर्दीच्या वेळा टाळुन इतर वेळी काम करणेस प्राधान्य द्यावयाचे आहे.रस्ता खोदाई झाल्यानंतर तातडीने पाईपलाईन/केबल टाकुन खोदाई बुजविणे, राडारोडा उचलणे व रस्ता पुर्ण साफ करून वाहतुकीस मोकळा करणे ही कामे लवकरात लवकर ठराविक कालावधीमध्येच पुर्ण करावीत.

२३. रस्ता क्रॉस करताना खोदाईधारक कंपनीने ३०० मि.मी. व्यासाचे दोन आर.सी.सी. पाईप खोदाईमध्ये टाकुण सदर पाईप एम-१५ या कॉक्रिट ग्रेडने एनकेसींग करून भविष्यातील अन्य सुविधाकरिता द्यावयाचे आहे. तसेच कंपनी धारकांनी सुध्दा त्यांच्या केबल पाईप डक्टमधुन टाकावयाच्या आहेत. सदर टाकण्यात आलेला डक्टची/पाईपची मालकी पुणे महानगरपालिकेची राहील.

२४. खोदाईधारक कंपनीने पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंत्याशी संपर्क साधुन पुर्नडांबरीकरण करणाऱ्या ठेकेदाराशी/एजन्सीशी संपर्क व समन्वय ठेवुन काम करावयाचे आहे. जेणेकरून रिईनस्टेंटमेंटची कामे वेळेत पुर्ण होतील.

२५. कंपनीधारकांनी पुणे महानगरपालिकेशी समन्वय राखणेसाठी अनुभवी अभियंता नेमणे आवश्यक आहे. सदर अभियंत्याने प्रत्यक्ष कामावर देखरेख करणे व पुणे महानगरपालिकेकडे अहवाल देणे अपेक्षित आहे. खोदाईधारककंपनीने या कार्यदेशाची एक प्रतखोदाईच्या प्रत्यक्ष जागेवर जबाबदार व्यक्तीकडे ठेवणे आवश्यक आहे.

२६. या कार्यआदेशाची प्रत प्राप्त होताच आपण इतर सर्व केबलधारकांशी संपर्क साधुन या विशिष्ठ मार्गावर अन्य कंपन्याची खोदाई होणार अगर कसे याबाबत खातरजमा करून त्याप्रमाणे समन्वय साधुन काम करावे.

२७. आवश्यकतेनुसार रस्ता क्रॉसिंग करणेसाठी ट्रॅफिक पोलिसांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच रहदारीच्या रस्त्यांवर रस्ता क्रॉसिंगची कामे शक्यतो रात्रीच्या वेळेस सुरक्षाबाबतची पुर्ण व्यवस्था करून करावीत.

२८. काही कारणांमुळे आपणास मान्यता दिलेल्या नुसार आपण खोदाई करू शकणार नसल्यास तसे पुणे महानगरपालिकेला तातडीने कळविण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत सदर रस्त्यांवर भविष्यात आपणास खोदाईसपरवानगी देता येणार नाही.

२९. विशिष्ठ परवानगीशिवाय सिमेंट कॉक्रिट रस्त्यावर व मास्टीक अस्फाल्ट केलेल्या रस्त्यावर खोदाई करण्यात येऊ नये.

३०. पेव्हर ब्लॉक/फुटपाथमध्ये खोदाई करण्यापुर्वी सदर ब्लाक १००% व्यवस्थित निघतील याकडे लक्ष देऊन सदरब्लॉक काढुन व्यवस्थित ठेवणे. तसेच सदर ब्लॉक पुणे महानगरपालिकेस हस्तांतरण करणे.

३१. डांबरी रस्त्यामध्यें पृष्ठभाग खोदाई करताना ब्रेकर वापरून रस्त्याची खोदाई करावी. जे.सी.बी.चा वापर करून डांबरी पृष्ठभाग खोदाई करण्यात येऊ नये.

३२. खोदाईधारक कंपनीने खोदाईचे काम पुर्ण झाल्यावर पुढील ७ दिवसात पुर्णत्वाचा दाखला मिळणेकामी पुणे महानगरपालिकेकडे अर्ज करणे आवश्यक आहे. पुणे मनपाकडील अभियंत्याने प्रत्यक्ष जागा पाहणी करून संपुर्ण राडारोडा व रस्ता साफझाल्याची खात्री करून पुर्णत्वाचा दाखला द्यावयाचा आहे.

३३. पुणे महानगरपालिकेच्या भविष्यातील रस्ता रूंदीकरणामुळे/फ्लायओव्हर वा तत्सम कामांमुळे जर सदरची टाकण्यात आलेली केबल/पाईपलाईन बदलणे वा हलविणे आवश्यक असल्यास, संबंधित कंपनीने त्यांचे स्वखर्चाने सदर केबल/पाईपलाईन पुणे महानगरपालिकेच्या अभियंत्यांच्या सुचनेनुसार हलविणे/बदलणे बंधनकारक आहे. त्यासाठी पुणे महानगरपालिकेकडुन संबंधित कंपन्याना ७ दिवस आधी लेखी पुर्व कल्पना देण्यात येईल.

३४. खोदाईधारक कंपन्यानी त्यांचे केबल/पाईपलाईन ही रस्त्याचे पृष्ठभागापासुन त्यांचे जबाबदारीवर प्रचलित मानांकामध्ये निश्चित केलेल्या खोलीवर टाकावी. रस्त्याखालील अस्तित्वातील पाण्याच्या लाईन/ ड्रेनेजलाईन/इलेक्ट्रीक केबल्स इ. सर्व्हीस वाहिन्यांचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

कोणत्याही वाहिन्यांचे/चेंबर्सचे नुकसान झाल्यास त्याची दुरूस्ती आपण स्वखर्चाने करून द्यावी अन्यथा आपणावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३५. प्रत्यक्ष खोदाई करताना वाहतुक वळविण्याची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे संबंधित कंपनीने स्वखर्चाने तशी व्यवस्था करून माहितगार गार्ड/कर्मचारी नेमावे.

३६. पुणे मनपा अभियंत्याचे सुचनेनुसार शक्यतो अस्तित्वातील डक्ट/आर.सी.सी पाईप/पी.व्ही.सी. पाईप यांचा वापर करून खोदाई न करता पाईपलाईन/केबल टाकण्यात यावी. परंतु परवानगीशिवाय व मान्यतेशिवाय कोणत्याही डक्टमधुन केबल/पाईपलाईन नव्याने टाकणेत येऊ नये अथवा दुरूस्ती करू नये.

३७. खोदाई करण्यापुर्वी शक्यतो मशिन डिटेक्टरचा वापर करून अस्तित्वातील जमिनीखालील सर्व्हीसेस बाबतची माहिती घेऊन खोदाई सुरू करावी.

३८. सदरचा कार्यादेश प्राप्त झाल्यावर खोदाई सुरू करण्यापुर्वी आपल्या कंपनीमार्फत स्थानिक प्रसिध्द वृत्तपत्रातुन खोदाई परवानगी बाबतची माहिती व जाहीर सुचना प्रसिध्दीस द्यावी.सदर वृत्तपत्रातील जाहीर सुचनेचे कात्रण पुणे महानगरपालिकेकडे दाखल करूनच नंतर खोदाईस सुरूवात करावी.

३९. टेली सर्व्हीसेस /ऑप्टीकल फायबर केबल कंपन्या यांनी त्यांचे दाखल महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडुन प्राप्त परवानगीमधील नमुद डक्ट संख्यानुसारच काम करावे. डक्टची संख्या मान्यतेपेक्षा वाढवु नये अन्यथा कारवाई करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेल्या डक्टच्या संस्थेनुसार पाईप /डक्ट व प्रत्यक्ष केबल कमी टाकल्यानंतर उर्वरित डक्ट/पाईप कोणत्याही कंपनीस भाड्याने हस्तांतरण व व्यापारासाठी उपयोग करता येणार नाही.

४०. रेल्वे पुलाखालुन वा रेल्वे मार्गाखालुन कोणतीही परवानगी देत येणार नाही.

४१. वरील बाबींची पुर्तता न केल्यास आपली परवानगी रद्द करणे वा पुढील निर्णय घेण्याचा तसेच अपवादात्मक परिस्थितीमध्ये अटींमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. मुख्य अभियंता पुणे महानगरपालिका यांचा राहील.

४२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम २३९, २४०, २४१ व ४८१ या अधिनियमातील अन्य तरतुदी खोदाईधारक कंपन्यांवर बंधकारक राहतील.

४३. सोबत जोडलेल्या नकाशातील लांबीनुसार व स्थळदर्शक नकाशानुसार काम करने बंधनकारक राहील.

कार्यकारी अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका

12/5/17

प्रत : १) **मा. उपायुक्त परिमंडळ क्र. २**

२) **मा.महापालिका सहाय्यक आयुक्त,**
नगररोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका

३) **संबंधित कार्यकारी अभियंता**

४) **कार्यालय अधिक्षक,**
पथ विभाग , पुणे महानगरपालिका